# महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

**Maharashtra Prathamik Shikshan Parishad**

**(Govt. of Maharashtra Undertaking)**

जा.क्र. मप्राशिप/सशिअ/व्यवस्थापन/प्रशिक्षण/२०१२-१३/१४३१ दिनांक : 20 APR 2012

## परिपत्रक

विषय :राज्यातील सर्व प्राथमिक / माध्यमिक शाळांमध्ये
विपश्यना साधना प्रशिक्षणाचा मित्र प्रकल्प राबविण्याबाबत.

शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण २०११/२९६/११/माशि-३, दिनांक ५ ऑक्टोबर, २०११ व शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण २०११ (२९६/११) माशि-३, दिनांक २७ जानेवारी, २०१२ नुसार राज्यातील सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांमधून आनापना ध्यान साधना प्रशिक्षण वर्ग सुरू करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. सदरचा प्रशिक्षण कार्यक्रम राज्यातील इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंत शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांच्या मानसिक व बौद्धिक वाढीकरिता उपयुक्त ठरणार आहे. शासन परिपत्रक दिनांक २७ जानेवारी, २०१२ अन्वये सदर उपक्रम हा मित्र उपक्रम MITRA (Mind in Training for Right Awareness) या नावाने संबोधण्यात येऊन सदर उपक्रम महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांतर्गत येणाऱ्या सर्व शासकीय शाळा व अनुदानित शाळा, अध्यापक विद्यालये व महाविद्यालये तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग व आदिवासी विकास विभागांतर्गत येणाऱ्या शासकीय आश्रमशाळा, अनुदानित आश्रमशाळा व वसतिगृहे इत्यांदीमध्ये राबविण्यात येत आहे. सदर मित्र उपक्रमाची अंमलबजावणी करण्याकरिता राज्य, जिल्हा व तालुका स्तरावर समित्या गठित करण्यात आल्या आहेत व समित्यांची कामेसुद्धा नमूद करण्यात आली आहेत. सदरच्या आदेशांमध्ये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग तसेच आदिवासी विकास विभागाच्या शाळांचा सुद्धा अंतर्भाव करण्यात आला आहे. दिनांक १५ एप्रिल ते १५ जून या शाळेच्या सुट्टीच्या कालावधीत महाराष्ट्रातील विविध प्रकारच्या शाळांमधील शिक्षकांना ११ दिवसांचे विपश्यना प्रशिक्षण व १ दिवसाचे मित्र प्रकल्पबाबतचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, सामाजिक न्याय



सर्व शिक्षा अभियान
सारे शिकूया, पुढे जाऊया

Jawahar Bal Bhavan, Netaji Subhash Marg, Charni Road, Mumbai - 400 004.
Tel. : 022-236 36 314, 236 79 287, Fax : 022-236 36 315, Email : mpspmah@vsnl.com, mpspmah@gmail.com

व विशेष सहाय्य विभाग तसेच आदिवासी विकास विभागातील शिक्षक व इतर अधिकारी / कर्मचारी यांना सुद्धा विपश्यना व आनापना ध्यान पद्धतीचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. या उपक्रमास विपश्यना केंद्राद्वारे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग व आदिवासी विकास विभागाच्या वसतिगृहांमध्ये तसेच काही निवडक नियमित विपश्यना केंद्राच्या ठिकाणी विपश्यना आनापना प्रशिक्षणासाठी पाठवावयाचे आहे. त्यासाठी येणारा अनुषंगिक खर्च करण्याबाबत महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद या संस्थेला मित्र उपक्रमाचे मुख्य प्राधिकरण (Nodal Agency) म्हणून निश्चित करण्यात आले आहे.

महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद यांनी मित्र उपक्रमाशी संबंधित शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण २०११/२९६/११/माशि-३, दिनांक २७ जानेवारी, २०१२ नुसार गठित राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय तसेच शाळास्तरीय समित्यांबरोबर सतत संपर्क ठेवावा. तसेच मित्र उपक्रमाकरिता सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची वसतिगृहे, आदिवासी विकास विभागाच्या आश्रमशाळा व स्वयंसेवी सेवाभावी संस्था व इतर संस्थांमध्ये आयोजित विपश्यना केंद्र मित्र उपक्रम समितीबरोबर संपर्क ठेऊन नियोजन करावे.

विपश्यना केंद्रांमध्ये पाठवावयाच्या प्रशिक्षणार्थींची जिल्हानिहाय यादी संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी संबंधित शिक्षण संचालक यांच्याशी विचार विनिमय करून निश्चित करावी. त्यांच्या जिल्ह्यांकरिता शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण २०११/२९६/११/ माशि-३, दिनांक ५ ऑक्टोबर, २०११ नुसार निवडलेल्या विपश्यना केंद्रावर प्रशिक्षणार्थींना पाठविण्याकरिता प्रशिक्षण शिबिर सुरू होण्याच्या कमीत कमी १० दिवस अगोदर आदेश परिपत्रक काढावे. त्याची एक प्रत संबंधित विपश्यना केंद्र प्रमुख यांच्याकडे, राज्य प्रकल्प संचालक, सर्व शिक्षा अभियान, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद तसेच संबंधित शिक्षण संचालक यांना पाठवावी.

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक २७ जानेवारी, २०१२ च्या परिपत्रकान्वये या उपक्रमाबाबत सविस्तर सूचना व कार्यपद्धती विहित करण्यात आली आहे. प्रत्येक शैक्षणिक वर्षाअखेर प्रत्येक जिल्ह्यातील किमान १०० शाळांना प्रति शाळा किमान २ शिक्षक उपलब्ध होतील अशा प्रकारे विपश्यना संस्थेच्या राज्यातील २७ केंद्रांच्या सहाय्याने प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन वर नमूद केल्याप्रमाणे १५ एप्रिल ते १५ जून दरम्यान करावयाचे आहे.

D:\Wadkar Sir\Liladhar\Vipashayana paripatrak.doc

मित्र उपक्रम / विपश्यना प्रशिक्षणांतर्गत प्रशिक्षणासाठी उपस्थित असलेल्या प्रशिक्षणार्थ्यांची यादी तसेच प्रति प्रशिक्षणार्थी रूपये २००/- प्रति दिन या प्रमाणे १२ दिवसांसाठी झालेल्या खर्चाची माहिती नियमित विपश्यना केंद्र या सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ मध्ये सादर करतील. त्याचप्रमाणे प्रशिक्षण पूर्ण केल्याबाबतचे प्रमाणपत्र परिशिष्ट-ब प्रमाणे प्रशिक्षणार्थ्यांना भेट देतील.

संबंधित विपश्यना केंद्र शिबिर संपल्यानंतर प्रशिक्षणार्थ्यांची यादी प्रमाणित (Certify) करून प्रत्यक्ष खर्चाच्या मागणीसह संबंधित जिल्ह्याच्या शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना पाठवतील. त्यामध्ये ३३ जिल्ह्यांमधून प्रत्येकी २०० शिक्षकांच्या मर्यादेत प्रती शिक्षक रू. २००/- प्रती दिन यामर्यादेत १२ दिवसांसाठी अनुज्ञेय राहील. प्रशिक्षणार्थींच्या प्रमाणित यादी व मागणी प्राप्त झाल्यानंतर संबंधित जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) सदर प्रशिक्षणासाठीचा खर्च जिल्ह्यासाठी सर्व शिक्षा अभियान अंतर्गत व्यवस्थापन या लेखाशिर्षाखाली जिल्हा स्तरावर क्षमता संवर्धन (Capacity building) या उप लेखाशिर्षावर मंजूर असलेल्या तरतुदीमधून धनादेशाद्वारे संबंधित संस्थेस अदा करतील. धनादेश प्राप्त झाल्यावर संस्था पावती संबंधित जिल्ह्याच्या शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना परिशिष्ट-क मध्ये सादर करतील. प्रशिक्षणार्थी शिक्षक / अधिकारी / कर्मचाऱ्यांना त्यांच्या आस्थापनेवरून प्रवासभत्ता नियमाप्रमाणे अनुज्ञेय राहील.

(संजय देशमुख)
राज्य प्रकल्प संचालक,
म.प्रा.शि.प., मुंबई.

प्रत,

१) मा. मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे खाजगी सचिव.
२) मा. राज्यमंत्री, शालेय शिक्षण विभाग यांचे खाजगी सचिव.
३) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.
४) मा. अप्पर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
५) मा. विभागीय आयुक्त, सर्व विभाग.
६) जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी यांचे कार्यालय (सर्व).
७) शिक्षण संचालक (प्राथमिक), प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

८) शिक्षण संचालक (माध्यमिक), माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचाल
राज्य, पुणे.

९) संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, कुमठेकर मार्ग, पु

१०) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, शिवाजीनगर,

११) संचालक, राज्य शैक्षणिक तंत्रज्ञान संस्था, बालचित्रवाणी, पुणे.

१२) संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बाल

१३) संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मीपा), औरंगाबाद.

१४) विभागीय शिक्षण उप संचालक, सर्व विभाग.

१५) आयुक्त, महानगरपालिका (सर्व).

१६) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).

१७) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद (सर्व).

१८) शिक्षणाधिकारी / प्रशासन अधिकारी, महानगरपालिका (सर्व).

१९) शिक्षण निरीक्षक, शिक्षण निरीक्षक यांचे कार्यालय, उत्तर, पश्चिम, दक्षिण विभाग.

परिशिष्ट-अ

# विपश्यना प्रशिक्षणाअंतर्गत प्रशिक्षणासाठी उपस्थित असलेल्या प्रशिक्षणार्थींची यादी व खर्चाची माहिती

**प्रशिक्षण कालावधी** ____________________

**ठिकाण** ____________________________

| क्र. | प्रशिक्षणार्थींचे संपूर्ण नाव व पत्ता | पद | मो.नं/फोन नं | स्वाक्षरी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | |
| २. | | | | | |
| ३. | | | | | |
| ४. | | | | | |
| ५. | | | | | |

उपरोक्त प्रमाणे दिनांक ___________ पासून ____________ पर्यंतच्या विपश्यना प्रशिक्षणांतर्गत एकूण ____________ इतक्या प्रशिक्षणार्थींची नोंद झालेली आहे. त्याकरीता प्रती प्रशिक्षणार्थी प्रती दिवस रू. २००/- प्रमाणे __________ (अक्षरी रूपये ________________ ________________________) इतका निधी धनादेशाद्वारे ____________________ __________________ या नावाने पाठविण्या यावा.

स्वाक्षरी
नियमित विपश्यना केंद्र
पद ____________
मो. नं. __________

D:\Wadkar Sir\Liladhar\Vipashayana paripatrak.doc

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, आयुष्यमान / आयुष्यमती ______________________________

_______________________________________ पद ______________________________ यांनी

दिनांक ______________ पासून ______________ पर्यंत विपश्यना प्रशिक्षण केंद्रामध्ये

प्रशिक्षण पूर्ण केल्याबद्दल प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

**स्वाक्षरी**

**ठिकाण**

**दिनांक / /२०१२**

**आयोजक ______________**

**विपश्यना प्रशिक्षण समिती**

______________

परिशिष्ट-क

## पावती

मी ______________________ पद ______________

पत्ता ______________________________ मो.नं. __________

लिहून देतो की मला विपश्यना प्रशिक्षणाअंतर्गत महाराष्ट्र शासनामार्फत मिळालेला ________ रूपये एवढा निधी प्रशिक्षणाच्या दरम्यान भोजन, निवासाकरिता खर्च झाला आहे. त्याकरिता मला एकूण रूपये ________ एवढे प्राप्त झाले आहेत. अशी पावती लिहून देतो.

स्वाक्षरी

पूर्ण नाव ______________________

पद ______________________

संस्था ______________________

पत्ता ______________________